# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

दि.२९/०८/२०२४

**वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे "पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार स्पर्धेचे" आयोजन**

**२५ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक**

वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे यावर्षी "पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार स्पर्धा २०२४" आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम, पर्यावरणपूरक सजावट, सामाजिक उपक्रमांनुसार मंडळांना गुणांकन देण्यात येणार असून ही स्पर्धा एकूण १०० गुणांची असणार आहे. सदर स्पर्धेत सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणेसाठी वसई विरार शहर **महानगरपालिकेची मंडप परवानगी** घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. सदर स्पर्धेचा अर्ज महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये तसेच महानगरपालिकेच्या **vvcmc.in** या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्ज सादर करण्याची **अंतिम तारीख ०७ सप्टेंबर २०२४** आहे. परिपूर्ण भरलेला अर्ज गणेश मंडळाला मंडप परवानगी दिलेल्या प्रभाग समिती कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

सदर स्पर्धा नि:शुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागरूकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनीप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तांसाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे महानगरपालिकेचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

०७ सप्टेंबरपासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात महानगरपालिका प्रभाग कार्यालय परीक्षण समिती सदस्य या स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि ०७ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर या कालावधीमध्ये परीक्षण करून गुणांकन करतील.

या स्पर्धेच्या प्रथम विजेत्या मंडळाला रु.२५,००१/-, द्वितीय विजेत्यांना रु.१५,००१/-, तृतीय विजेत्यांना रु.१०,००१/- रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच उत्तेजनार्थ १० मंडळांना प्रत्येकी १००१/- रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**